# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/11/2023 (रविवार) सकाळ


## नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे दीपावलीच्या शुभमुहूर्तावर दिवाळी स्नेहमिलन व पर्यावरणपूरक फटाकाचा कार्यक्रम संपन्न

दीपावलीच्या शुभमुहूर्तावर दिनांक ११/११/२०२३ रोजी सायंकाळी ०७.०० वा. दरम्यान नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे जिल्ह्यातील बालगृहातील मुले तसेच पोलीस कुटुंबासोबत दिवाळी स्नेहमिलन व पर्यावरणपूरक फटाक्याचा कार्यक्रम पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथील कवायत मैदानावर मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात शासकीय मुलीचे बालगृह काटोल रोड नागपूर, अनुग्रह बालगृह खापरखेडा, कनिष्ठ बालगृह पाटणकर चौक, शरणस्थान बॉइज होम वाघोडा सावनेर बालगृह येथील असे एकुण १३४ मुला मुलींना दिवाळी सणानिमीत्त मान्यवरांच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आली. त्यांच्यासोबत ग्रीन फटाके फोडुन मान्यवरांनी दिवाळी हा सण उत्साहात साजरा केला. बालगृह येथील मुलांना तसेच पोलीस कुटुंबांना मान्यवरांनी दिवाळी सणानिमीत्त शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणुन मा. श्री. छेरींग दोरजे, विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परीक्षेत्र नागपूर, मा. श्रीमती अस्वती दोरजे, सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. संदीप पाटील पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परीक्षेत्र (नक्षलविरोधी अभियान), मा. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, सौ. आदिती हर्ष पोद्दार, मा. श्री. हाडा डी. एफ. ओ, श्री. आशित कांबळे उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, श्री. विजय माहुलकर पोलीस उप अधीक्षक (गृह), श्रीमती प्रतिभा भरोसे राखीव पोलीस निरीक्षक, डॉ. हर्षा घोडेस्वार वैद्यकीय अधिकारी पोलीस रूग्णालय तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार श्री. अनिल राऊत, तसेच इतर अधिकारी कर्मचारी हजर होते.














पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर